नि.दि.मु.क्र.११८/२०११          रामचंद्र वि. पार्वती व अन्य

## नि.५६ वरील आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज वादपत्र सुधारणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

२. खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात व मी त्याबाबत माझे निष्कर्ष त्याखाली नमूद कारणमिमांसेवरुन नोंदवत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तावीत सुधारणा या दाव्याच्या योग्य व प्रभावी न्यायनिवाड्याकरिता आवश्यक आहे काय? | ..होय. |
| २. | प्रस्तावीत सुधारणेमुळे अर्जदार पक्षकाराच्या कथनांद्वारेच्या भूमिकेत पूर्णतः व मूलगामी बदल होतील काय? | ..नाही. |
| ३. | प्रस्तावीत सुधारणा मंजुर केल्यास कालापव्ययामुळे दुस-या पक्षकाराच्यालाभात निहीत झालेले हितसंबंध प्रभावीत होतील काय? | ..नाही. |
| ४. | आदेश काय? | ..अर्ज मंजुर. |

## कारणमिमांसा

मुद्दे क्र.१ ते ३ बाबतः

३. वादीने वादपत्रात दावा मिळकतीबाबत काही सुधारणा सुचवल्या आहेत. प्रतिवादींनी त्या नाकारलेल्या नाहीत.

४. या संदर्भात अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसते की, दावा वाटपासाठी. त्या अनुषंगाने वादीच्या म्हणण्यानुसार काही वाटप योग्य मिळकतीबाबत दावा सुधारणा प्रस्तावित केली आहे. त्यावर म्हणणे देण्याची प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी म्हणणे देऊन आक्षेप घेतल्याचे दिसत नाही. वास्तविक, बहुतांश प्रतिवादी याकामी हजर असून त्यांनी त्यांचे प्रतिवादपत्रे (नि. ४९, ५१ व ५३) दिलेली दिसतात. यावरुन प्रस्तुत अर्जाला कोणाचाही ठोस

आक्षेप नसल्याचे दिसून येते. दावा वाटपासाठी असल्याने सदर सुधारणा मंजूर करणे उचित होईल. येथे हे देखील नमूद करणे आवश्यक आहे की, त्याबाबत प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार असून आवश्यक तो साक्षी पुरावा देण्याची पुर्ण संधी उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे प्रस्तावित सुधारणा मंजुर केल्यास कोणत्याही बाजूची अनिरसनीय हानी होईल व दाव्याच्या स्वरुपात अमुलाग्र बदल होईल अशी बाब माझ्या समोर आलेली नाही. या सर्व बाबींचा एकत्रीत विचार करुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर 'होकारार्थी' तर मुद्दे क्र.२ व ३ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

मुद्दा क्र.४ बाबतः

५. उपरोक्त निष्कर्षीत केल्यानुसार वादीचा अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. यास्तव मी खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

१. वादीचा वादपत्र सुधारणेचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तुत दावा सुधारणा ७ दिवसांच्या आत विहीत प्रक्रियेद्वारे करावयाची आहे.

सही/-

दिनांकः ३०.०१.२०१४.

(कि. सा. जाधव)
४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), इस्लामपूर.